आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
६ मे २०२६ - बुधवार

**ठळक बातम्या**

- भारत आणि व्हिएतनाममध्ये डिजिटल तंत्रज्ञान, दुर्मिळ खनिज, संस्कृती, पर्यटन यासह विविध क्षेत्रात सामंजस्य करार

- राज्य सरकारची सुधारित राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना ३१ डिसेंबरपर्यंत निवडण्याचा कर्मचाऱ्यांना पर्याय

- पश्चिम बंगालमध्ये नव्या सरकारचा शपथविधी शनिवारी, आगामी रणनीतीबाबत तृणमूल काँग्रेसची बैठक सुरू

- देशातल्या शेअर आणि सराफा बाजारात तेजी

**आणि**

- होर्मुझची सामुद्रधुनी खुली केली नाही तर इराणवर तीव्र बॉम्बहल्ले करण्याचा अमेरिकेचा इशारा

**<><><><><>**

भारत आणि व्हिएतनामध्ये आज डिजिटल तंत्रज्ञान, दुर्मिळ खनिजं, वैद्यकीय उत्पादनांचं नियमन, सार्वजनिक क्षेत्रातील लेखापरीक्षण, डिजिटल पेमेंट प्रणाली आणि संस्कृती आणि पर्यटन या क्षेत्रांमध्ये अनेक सामंजस्य करार करण्यात आले. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि व्हिएतनामचे अध्यक्ष तो लाम यांच्यात आज नवी दिल्लीत द्विपक्षीय चर्चा झाली. याविषयी जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून

- **- - होल्ड कॅप्सूल - - -**

*(संरक्षण क्षेत्रात सहकार्य अधिक दृढ करून भारत आणि व्हिएतनाम शांतता, स्थिरता आणि समृद्धीसाठी योगदान देत राहतील, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज केलं. लाम यांच्यासोबत झालेल्या चर्चेनंतर वार्ताहरांना निवेदन देताना ते बोलत होते. व्हिएतनामचे राष्ट्राध्यक्ष म्हणून निवडून आल्यानंतर एका महिन्याच्या आत तो लाम यांचा पहिला भारत दौरा होत आहे. हा दौरा भारत-व्हिएतनाम संबंधांना लाम यांनी दिलेला प्राधान्यक्रमच दर्शवतो, असं मोदी म्हणाले. व्हिएतनाम हा भारताच्या 'ॲक्ट ईस्ट पॉलिसी' आणि 'व्हिजन ओशन'चा*

*एक महत्त्वाचा आधारस्तंभ आहे. इंडो-पॅसिफिक क्षेत्रातही दोन्ही देशांचा दृष्टिकोन समान आहे. भारत आणि व्हिएतनाम यांच्यातल्या व्यापारी संबंधांविषयी मोदी म्हणाले..*

**- - होल्ड... बाईट - नरेंद्र मोदी - -**

*यावेळी शहरी व्यवस्थापन आणि आर्थिक विकासाच्या दृष्टीने एक समान चौकट तयार करण्याच्या उद्देशानं बृहन्मुंबई महानगरपालिका आणि हो ची मिन्ह शहराची पालिका यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला. भारतीय द्राक्षांची निर्यात आता व्हिएतनामध्ये होणार असल्याची घोषणाही या बैठकीनंतर करण्यात आली. या करारांमुळे भारताची कृषी, मत्स्यव्यवसाय आणि पशु उत्पादनांची व्हिएतनामला होणारी निर्यातही अधिक सुलभ होईल, असं मोदी म्हणाले.*

*तीन दिवसांच्या भारत दौऱ्यावर आलेले तो लाम यांचं आज नवी दिल्लीत राष्ट्रपती भवनात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी औपचारिक स्वागत केलं. त्यानंतर लाम यांनी राजघाट इथे जाऊन महात्मा गांधी यांच्या समाधीचं दर्शन घेतलं आणि त्यांना आदरांजली वाहिली. उद्या ते मुंबई दौऱ्यावर आहेत.)*

**<><><><><>**

एनपीएस अर्थात राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजनेअंतर्गत येणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी राज्य सरकारची सुधारित राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना ऐच्छिक असणार आहे. अर्थ विभागाने आज यासंदर्भात परिपत्रक जारी केलं. येत्या ३१ डिसेंबरपर्यंत कर्मचाऱ्यांना पर्याय निवडता येईल. याविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून

**- - - होल्ड व्हाइस कास्ट - - -**

*(राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेत येणाऱ्यांना राज्याच्या सुधारित राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजनेचा पर्याय स्वीकारता येईल. हा पर्याय स्वीकारणाऱ्यांची किमान २० वर्ष सेवा झाली असेल तर त्यांना शेवटच्या वेतनाच्या ५० टक्के निवृत्तीवेतन मिळेल. त्यापेक्षा कमी सेवा झालेल्यांना सेवेच्या प्रमाणात निवृत्तीवेतन मिळेल. ही रक्कम किमान साडे ७ हजार रुपये असेल असं सरकारनं स्पष्ट केलंय. पण दहा वर्षांपेक्षा कमी सेवा झाली तर कर्मचारी या योजनेच्याअंतर्गत निवृत्तीवेतनाला पात्र ठरणार नाही. राजीनामा दिलेल्या कर्मचाऱ्याला सुधारित योजनेनुसार निवृत्तीवेतन मिळणार नाही, त्याला केवळ राष्ट्रीय निवृत्तीवेतन*

*योजनेनुसार लाभ मिळतील. हा पर्याय स्वीकारणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांना ६० टक्के रक्कम निवृत्तीवेतन म्हणून मिळेल आणि त्यावर महागाई भत्ताही दिला जाईल. सुधारित निवृत्तीवेतन योजनेचा पर्याय स्वीकारणाऱ्या कर्मचाऱ्यांना NPS मधून यापूर्वी काढलेल्या रकमेचा भरणा १० टक्के व्याजासह करावा लागेल. विविध विद्यापीठे, जिल्हा परिषद, शासकीय आणि अनुदानिक शैक्षणिक संस्थांमधल्या कर्मचाऱ्यांनाही हे नियम लागू होतील.)*

**<><><><><>**

पश्चिम बंगालमधे भाजपाच्या नेतृत्वाखालच्या नव्या सरकारचा शपथविधी ९ मे ला कोलकता इथल्या ब्रिगेड मैदानावर होणार आहे. सकाळी दहा वाजता शपथविधी समारंभाला सुरुवात होईल, असं भाजपाचे प्रदेशाध्यक्ष समित भट्टाचार्य यांनी वार्ताहरांना सांगितलं. या समारंभाला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि भाजपाशासित राज्यांचे मुख्यमंत्री येण्याची शक्यता आहे. शुक्रवारी संध्याकाळी ४ वाजता पक्षाच्या विधीमंडळ गटाची बैठक होणार आहेत. त्यात केंद्रीय निरीक्षक अमित शहा यांच्या देखरेखीखाली मुख्यमंत्री पदाच्या उमेदवाराची निवड होण्याची शक्यता आहे.

दरम्यान, तृणमूल काँग्रेसच्या नवनिर्वाचित आमदारांची बैठक आज कोलकात्यामध्ये ममता बॅनर्जी यांच्या घरी सुरू आहे. निवडून आलेल्या ८० पैकी ६९ आमदार या बैठकीला उपस्थित आहेत.

**<><><><><>**

तमिळनाडू  विधानसभा निवडणुकीत सर्वात मोठा पक्ष ठरलेल्या तमिळगा वेत्री कळघमने आज राज्यपाल राजेंद्र अर्लेकर यांच्याकडे सरकार स्थापन करण्यासाठी दावा केला. सी. जोसेफ विजय यांच्या नेतृत्वाखाली टीव्हीके ला १०८ जागा मिळाल्या आहेत, बहुमतासाठी त्यांना ११८ जागांची गरज आहे. काँग्रेसच्या पाच आमदारांनी पाठिंबा जाहीर केल्यामुळे टिव्हीकेला बहुमतासाठी आणखी पाच आमदारांची गरज आहे. टिव्हीकेने बहुमत सिद्ध करण्यासाठी दोन आठवड्यांची मुदत मागितली आहे, असं राज्यपाल राजेंद्र आर्लेकर यांनी वार्ताहरांना सांगितलं.

दरम्यान टिव्हीकेला पाठिंबा द्यायला अण्णा द्रमुकनं नकार दिला आहे. दुसरीकडे काँग्रेसने टिव्हीकेला पाठिंबा दिल्यामुळं त्यांनी द्रमुकचा विश्वासघात केल्याची टीका द्रमुकच्या

प्रवक्ता कनिमोळी एन व्ही एन सोमु यांनी केली. द्रमुकने कठीण काळात काँग्रेसची साथ दिल्याचं त्या म्हणाल्या.

<><><><><>

राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी आज आपल्या राज्यसभा सदस्यत्वाचा राजीनामा दिला. उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन यांची आज भेट घेऊन त्यांना आपला राजीनामा सादर केला. उपराष्ट्रपतींनी त्यांचा राजीनामा स्विकारला असल्याचं त्यांनी आपल्या समाजमाध्यमावरच्या पोस्टमध्ये म्हटलं आहे.

<><><><><>

सीबीएफसी अर्थात केंद्रीय चित्रपट प्रमाणन मंडळाच्या अध्यक्षपदी शशिशेखर वेम्पती यांची नेमणूक झाली आहे. त्यांचा कार्यकाळ ३ वर्षांचा असेल. वेम्पती यांनी यापूर्वी प्रसारभारतीचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून काम पाहिलं आहे.

<><><><><>

पंजाबच्या जालंधर इथं काल झालेल्या स्फोटाची जबाबदारी, खलिस्तान लिबरेशन आर्मीने स्वीकारली आहे. या स्फोटांची चौकशी सुरू असल्याची माहिती जालंधरच्या पोलीस आयुक्त धनप्रीत कौर यांनी दिली. आज ऑपरेशन सिंदूरचा वर्धापन दिन असल्याने, पंजाबमध्ये अशांतता निर्माण करण्याच्या पाकिस्तानच्या आयएसआयच्या योजनेचा हा एक भाग आहे, असं त्या म्हणाल्या.

पहिला स्फोट जालंधरमधे सीमा सुरक्षा दलाच्या मुख्यालयाबाहेर आणि दुसरा स्फोट अमृतसरमधे लष्करी छावणीजवळ झाला होता.

<><><><><>

इराणबरोबरच्या चर्चांमध्ये प्रगती असल्याची अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केलेल्या घोषणेमुळे कच्च्या तेलाच्या घसरलेल्या किमतींचा सकारात्मक परिणाम देशातल्या शेअर बाजारांवर दिसून आला. सेन्सेक्स आज ९४१ अंकांनी वधारुन ७७ हजार ९५९ अंकांवर बंद झाला. निफ्टी २९८ अंकांची वाढ नोंदवून २४ हजार ३३१ अंकांवर स्थिरावला. जागतिक बाजारपेठेत कच्चं तेल ८ टक्क्यांनी कोसळून बॅरलमागे १०१ डॉलरच्या आसपास आलं.

परकीय चलन बाजारपेठेत रुपया आज ६८ पैशांनी वधारल्यानं १ डॉलरसाठी ९४ रुपये ६१ पैसे मोजावे लागत होते.

सोनं आणि चांदीही आज महाग झालं. सोन्याच्या किंमती आज सुमारे सव्वा ३ हजार रुपयांनी महाग झाल्यानं एक तोळा २२ कॅरेट सोनं १ लाख ५१ हजार रुपयांना तर एक तोळा २४ कॅरेट सोनं १ लाख ५५ हजार रुपयांना मिळत होतं. चांदी सुमारे साडे ८ हजार रुपयांनी महाग झाल्यानं एक किलो चांदीसाठी २ लाख ५६ हजार रुपये मोजावे लागत होते.

<><><><><>

इराणने होर्मुझची सामुद्रधुनी खुली केली नाही तर इराणवर तीव्र बॉम्बहल्ले करू असा इशारा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दिला आहे. इराणसोबतचं  युद्ध लवकरच संपुष्टात येईल, आणि तेल तसंच नैसर्गिक वायू वाहून नेणाऱ्या जहाजांची वाहतूक सुरळित होईल असं ट्रम्प म्हणाले. युद्ध समाप्तीसाठी इराण अमेरिकेच्या अटी मान्य करेल, त्यांनी तसं केलं नाही  तर अमेरिका इराणवर प्रचंड बॉम्बहल्ले करेल असं ट्रम्प म्हणाले.

<><><><><>

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज हैदराबाद इथल्या राजीव गांधी  आंतरराष्ट्रीय मैदानावर सनरायजर्स हैदराबाद आणि पंजाब किंग्स यांच्यात सामना सुरु आहे. यात पंजाबनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे. शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा हैदराबादच्या ९ षटकात २ बाद १०७ धावा झाल्या होत्या.

//<><><><><>//